# भूमिगत मेट्रोच्या चाचण्या यशस्वी

## पुढच्या वर्षाअखेरीस पहिला टप्पा सुरू होणे अपेक्षित



**म. टा. खास प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील पहिला भूमिगत मेट्रो प्रकल्प असलेल्या मेट्रो मार्गिकेची मागील आठवड्यात यशस्वी चाचणी झाली. एकूण तीन किलोमीटरची ही चाचणी होती. त्याचा व्हिडीओ ही मार्गिका उभ्या करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) बुधवारी ट्विटरवरून प्रसारित केला आहे. त्यामुळे डिसेंबर २०२३पर्यंत पहिला टप्पा पूर्ण होण्याची शक्यता आहे.

मुंबईला पश्चिमेकडून उत्तर-दक्षिण जोडण्यासाठी मेट्रो-३ हा भूमिगत मार्ग प्रकल्प उभा होत आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ, असे त्या प्रकल्पाचे नाव आहे. त्यातील पहिला टप्पा सीप्झ ते बीकेसी उत्तर तर दुसरा टप्पा बीकेसी दक्षिण ते कफ परेड असा होणार आहे. पहिल्या टप्प्याची मार्गिका पूर्ण तयार असून स्थानकांची कामे ८० टक्के झाली आहेत. याच पहिल्या टप्प्यातील मार्गावर मेट्रो रेल्वेची चाचणी अलिकडे घेण्यात आली.

या प्रकल्पात एकूण २७ स्थानके आहेत. ही चाचणी मरोळ नाका स्थानकापासून आरे कारशेडजवळील सारिपूतनगरपासून करण्यात आली. सारिपूतनगर ते मरोळ, या तीन किमी मार्गावर तीन स्थानकांदरम्यान ही मेट्रो मध्यम वेगाने धावली. त्यामध्ये मरोळपासून सुरू होऊन सारिपूतनगरपर्यंत ती सोडण्यात आली होती. यादरम्यान भूमिगत रेल्वे ट्रॅकची सक्षमता तपासण्यात आली. सारिपूतनगर नंतर ही मेट्रो कारशेडमध्ये जाण्यासाठी जमिनीखालून जमिनीवर येते, हे संबंधित व्हिडीओमध्ये दिसून येत आहे.

**'तीन स्थानके सुरू करा'**

गाडीची चाचणी सुरू असताना तीन स्थानकांच्या फलाटाला असलेले काचेचे कवच लागल्याचे (प्लेटफॉर्म स्क्रीन डोअर्स) दिसले. एकूणच या चाचणीनुसार आता हा प्रकल्प पहिल्या टप्प्यासाठी पूर्णपणे सज्ज असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे किमान तीन स्थानकांसाठी ही मार्गिका तातडीने सुरू करावी मागणी मुंबईकर चाकरमान्यांनी एमएमआरसीएलकडे ट्विटरच्या माध्यमातून केली. सीप्झमधील सर्व उद्योगधंदे व कार्यालये पूर्ण क्षमतेने सुरू झाली आहेत. त्यामुळे येथील कर्मचाऱ्यांचा आकडा मोठा आणि वाढता आहे. पण या कर्मचाऱ्यांना सायंकाळी सीप्झहून अंधेरी रेल्वे स्थानक किंवा मेट्रो-१ गाठण्यासाठी मरोळच्या दिशेने बस मिळत नाही. तासनतास ताटकळत राहावे लागते. त्यात भरपूर गर्दी होते. यामुळे किमान आरे ते मरोळ नाका, अशा तीन स्थानकांची सेवा तातडीने सुरू करा, अशी मागणी होत आहे.